Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ६० वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाच्या ६० वा दीक्षांत समारंभासाठी ऑक्टोबर २०२२ व मार्च २०२३ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन (Online) अर्ज खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कालावधी | विहीत शुल्क |
|---|---|---|
| १) | दि. १७ ऑगस्ट २०२३ ते दि. ०५ सप्टेंबर २०२३ पर्यत | रु. २५०/- |
| २) | दि. ०६ सप्टेंबर २०२३ ते दि. १५ सप्टेंबर २०२३ पर्यत | रु. ३५०/- |
| ३) | दि. १६ सप्टेंबर २०२३ ते दि. २५ सप्टेंबर २०२३ पर्यत | रु. ८५०/- |
| | पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्याचे दीक्षांत अर्ज दि. ३० सप्टेंबर २०२३ पर्यत रु ८५०/- शुल्काने स्वीकारले जातील. | |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation) या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल. ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम संकेतस्थळावरील सर्व सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी.
- विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतले असेल तर पुन:श्च अर्ज करु नये.
- ऑनलाईन अर्ज करताना आलेली माहिती बरोबर आहे की नाही याची खात्री करावी. जर विद्यार्थ्याच्या नावात/अन्य दुरुस्ती असल्यास प्रथम संबंधीत परीक्षा विभागाशी/संबंधित महाविद्यालयातून/स्वायत्त महाविद्यालयातुन ती दुरुस्ती करुन माहिती अपडेट करुनच पदवी प्रमाणपत्राकरीता संबंधित ऑप्शनमधून अर्ज भरावा.
- एका पदवी प्रमाणपत्र अर्जासाठी एक ई मेल आयडी वापरावा.
- सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- विधी विद्याशाखा विद्यार्थ्यांनी फक्त अंतिम वर्षाच्या पदवी प्रमाणपत्राकरीता ऑनलाईन अर्ज करावा व ३ वर्षातील ''बॅचलर ऑफ लॉ (जनरल)'' व ५ वर्षातील ''बॅचलर ऑफ सोशल लॉ'' पदवी प्रमाणपत्राकरीता मॅन्युअल अर्ज सादर करावा. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांसहीत दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा
- २००२ पासून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी रेग्युलर ऑप्शन मधून फॉर्म भरण्यात यावा. तसेच २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्याचा फॉर्म Regular ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थानी फॉर्म भरण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रांसहीत प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संपर्क साधावा. (अंतीम वर्षाचे मार्कलिस्टची झेरॉक्स, स्वत:चा आयकार्ड साईज फोटोच्या दोन प्रती व फोटोशी साम्य असलेले स्वत:चे आयडेटी प्रुफ झेरॉक्स, आईचे नावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे उदा. आईचे आधारकार्ड, वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी Internship completion Certificate of University प्रत आणणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात येणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. (फोन नं.०२३१-२६०९११३/२६०९३०२ व ईमेल - convocation@unishivaji.ac.in)
- अर्ज ऑनलाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत अथवा ज्या विद्यार्थ्याचे फोटो ऑनलाईन दिसत नाहीत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG image (20 kb) अपलोड करुन अर्ज ऑनलाईन भरावा.
- अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.
- दीक्षांत समारंभाची तपशिलवार माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ठेवण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांना SMS व्दारे कळविण्यात येईल.
- दीक्षांत शुल्क ऑनलाईन भरत असताना एकदा पेमेंट झालेबाबतचा संदेश आलेनंतर पुन्हा किमान ६० मिनिटे पुन:श्च पेमेंट करु नये. अन्यथा (Double Payment) होवू शकते.
- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत विद्यापीठाचे (Internship Complition Certificate) प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षांत अर्जासोबत फक्त Declaration of Result letter ची प्रमाणित प्रत सुस्पष्ट अपलोड करणे आवश्यक आहे.(उदा. Ph.D / M.Phil etc.) तसेच अर्जावर Viva-Voce, Declaration Date बिनचूक नमूद करावी.
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षांत अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. फक्त गुणांमध्ये बदल झाला असेल व श्रेणी सुधारणा झाली नसेल तर अर्ज करु नये. श्रेणीसुधारणा झालेल्या विद्यार्थ्यांनीच अर्ज करावा,
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता, पिनकोडसहीत बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार/पदवी प्रमाणपत्र पोहचू शकले नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.
- दूरशिक्षणव्दारे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व बंद झालेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील (उदा. सोलापूर जिल्हा) विद्यार्थ्यांना रजिस्टर पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येईल.
- दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्याची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्याने त्याच्या Log in मधील Grievance मध्ये ती नोंदवावी.
- अपुऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही आणि त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभानंतर विहित सर्व प्रक्रीया पुर्ण केलेनंतरही पदवीप्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास, त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागास, समारंभानंतर तीन महिन्याच्या आत संपर्क साधावा. त्यानंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- ऑनलाईन अर्ज करताना काही अडचणी उदभवल्यास खालील दुरध्वनी क्रमांकाशी संपर्क साधावा
  १) ऑनलाईन अर्जाबाबतीत तांत्रिक अडचणीबाबत संपर्क क्रमांक - आय.टी.सेल ०२३१-२६०९३३५
  २) ऑनलाईन शुल्काबाबत उद्भवणा-या अडचणीबाबत संपर्क क्रमांक -लेखा विभाग ०२३१-२६०९०७८
  ३) दीक्षांत विभाग ०२३१-२६०९११३ /०२३१-२६०९३०२.

**डॉ. अजितसिंह एन.जाधव**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**दीक्षांत विभाग**
**दि. १५ ऑगस्ट, २०२३**